# यामुळे एनपीआर–एनआरसीचा सर्वाधिक फटका भारतातील गरीबांना बसेल

नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) आणि प्रस्तावित राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (एनपीआर), जे राष्ट्रीय नागरिक नोंदणीमध्ये (एनआरसी) रूपांतरित होतील, यांच्या विरोधात जोरदार निदर्शने होत आहेत. घटनाविरोधी, भेदभाव करणारया आणि गरीब–विरोधी असलेल्या या खेळींमागील धोके मोठ्या संख्येने भारतीयांना समजले आहेत. भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) विभाजनवादी धोरणांविरूद्ध भारतीय लोक स्पष्टपणे एका आवाजात बोलले आहेत. आसाममध्ये तर, जिथे एनआरसी आधीपासूनच लागू केली गेली होती, 19 लाख लोकांना 'राज्यहीनते'च्या काठावर आणून सोडले आहे, ज्यांच्यावर आता निर्दयी अशा परदेशी नागरिक न्यायाधिकरणांना सामोरे जाऊन स्वतःच्या भारतीय असल्याचे पुरावे सादर करण्याची जबाबदारी आहे.

आता तर अखिल भारतीय एनपीआर–एनआरसीची संभावना असल्याने भारतीय समाजात अशांतता माजण्याची शक्यता आहे. यामुळे संपूर्ण देशाची अवस्था आसामसारखी होईल. कामगार संघटना आणि कार्यकर्त्यांना हे माहित आहे की याचा सर्वाधिक फटका असंगठित क्षेत्रातील कामगार, आदिवासी–वनवासी, अनुसूचित जाती / जमाती, ओबीसी आणि मुस्लिमांना बसणार आहे.

## कोणाला सर्वाधिक त्रास होण्याची शक्यता आहे?

भारताच्या प्रचंड लोकसंख्येला, विशेषतः गरीबीने पछाडल्यामुळे उपेक्षित असलेले 40 टक्के लोक, 8 कोटी आदिवासी आणि वनवासी, 27–28ः लोकसंख्या जी दलित, अल्पभूधारक व सीमांत शेतकरी, स्थलांतरित कामगार, विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगार आणि अर्थातच मुस्लिम आहे. एससी, एसटी आणि ओबीसींना ऐतिहासिक दृष्ट्या शिक्षणापासून आणि मालमत्तेच्या मालकीपासून दूर ठेवले गेले आहे आणि नोंदणी प्रक्रिया सुरू झाल्यावर त्या सर्वांवर परिणाम होईल!

भारतातील तब्बल 400 दशलक्ष लोक असंघटित क्षेत्रात काम करतात म्हणजे सध्याच्या एकूण कर्मचारी संख्येच्या 90 टक्के. यातील जवळपास दशलक्ष 39 दशलक्ष मुस्लिम असून त्यापैकी 36.5 दशलक्ष मुस्लिम पुरुष आणि उर्वरित 2.5 दशलक्ष महिला आहेत. काही कुटुंबांमध्ये फक्त एकच काम करणारा सदस्य असतो, बहुतेकवेळा तो पुरुष असतो आणि जर त्या व्यक्तीला कागदपत्रे जमा करण्यासाठी वणवण करावी लागल्यास, त्याच्या कुटुंबाला प्रचंड आर्थिक नुकसान सोसावे लागेल आणि त्या कुटुंबाला दारिद्र्यात ढकलले जाईल. हेच या सरकारला हवे आहे काय?

**1. कामाच्या अटींनुसार**
लहान आणि सीमांत शेतकरी, भुमिहिन शेतमजूर, बटाईदार, मच्छिमार, पशुसंवर्धन, बीडी वळणे, लेबलिंग आणि पॅकिंग यामध्ये गुंतलेले लोक, इमारत आणि बांधकाम कामगार, चामड्याचे कामगार, विणकर, कारागीर, मीठ कामगार, वीटभट्ट्यांमधील आणि दगडाच्या खाणींमधील कामगार आणि दगडी खाणी कोठार, लाकूड गिरण्या आणि तेल गिरण्यांमधील कामगार यांचा या श्रेणीत समावेश होतो.

**2. रोजगाराच्या स्वरूपाच्या अटींनुसार**
संलग्न शेतमजूर, वेठबिगार, स्थलांतरित कामगार, कंत्राटी आणि प्रासंगिक कामगार या श्रेणीत येतात.

**3. विशेष गांजलेल्या वर्गाच्या अटींनुसार**
ताडी गोळा करणारे, मैलासफाई कामगार, डोक्यावरून भार वाहणारे, प्राण्यांनी भरलेल्या वाहनांचे चालक व त्यांची

चढ–उतार करणारे या श्रेणीत येतात.

**4. सेवा अटींच्या श्रेणीनुसार**

दाया, मोलकरणी, मच्छीमार पुरुष आणि महिला, नावी, फळे आणि भाज्या विक्रेते, वृत्तपत्र विक्रेते इत्यादी या श्रेणीत येतात.

हे असंघटित क्षेत्रातील कामगार मुख्यतः अनुसूचित जाती / जमाती, इतर मागासवर्गीय आणि धार्मिक अल्पसंख्यांकांचे आहेत ज्यांच्यापैकी बहुतेकांचा कायमस्वरूपी निवासी पत्ता नसतो, जन्म किंवा शाळेचा दाखला नसतो आणि त्यामुळे मतदार ओळखपत्र आणि आधार ओळखपत्रांसाठी अर्ज करण्यात त्यांना अडचणी असतात. इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी राज्यमंत्री केजे अल्फोंस यांनी 2018 मध्ये संसदेला सांगितले होते की एकूण लोकसंख्ये पैकी 89% पेक्षा जास्त लोकांना आधार कार्ड मंजूर झाली आहेत. 2019 मध्ये भारतात सुमारे 900 दशलक्ष पात्र मतदार होते, ज्यापैकी 95.64% फोटो ओळखपत्र होते. आधारचा वापर करणारया 40 कोटींहून अधिक असंघटित कामगारांना विमा आणि निवृत्तीवेतनासारखे लाभ देण्याचे सरकारचे नियोजन असताना, सरकारमध्ये अजून बायोमेट्रिक ओळखपुरावे किंवा मतदार ओळखपत्रे नागरिकतेचा पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येतील की नाही याबाबत स्पष्टता नाही.

## का?

## उदाहरणे:

एक, बंगळुरूच्या वस्त्र उद्योगात, अनौपचारिक महिला कामगारांना अजूनही आधारसाठी नावनोंदणी करणे अवघड जात आहे कारण पत्त्याच्या पुराव्यासाठी एकापेक्षा जास्त कागदपत्रांची आवश्यकता आहे. स्थलांतरीतांची घरे इतर राज्यात असल्याने बयाचदा त्यांना ती कागदपत्रे सादर करणे कठीण जाते.

दोन, बंगळुरूच्याच एपीएमसी मार्केटमध्ये 3,000 पेक्षा जास्त हमालांकडे कोणतीच कागदपत्रे नाहीत, मतदार ओळखपत्रही नाही! एनपीआर–एनआरसी प्रक्रिया सुरू होईल तेव्हा त्यांचे काय होईल?

तीन, एमसीजीएम (बृहन्मुंबई महानगरपालिका) येथे कार्यरत 2700 कंत्राटी सफाई कामगारांना 12 वर्षांच्या संघर्षानंतर नोकरीत कायमस्वरूपी करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने 7/4/2017 रोजी हायकोर्टाच्या आदेशाची पुष्टी करून आमच्या बाजूने निर्णय दिला. परंतु एमसीजीएमने स्पेलिंगमधील भिन्नतेच्या म्हणजे नावातील तफावतीचे कारण देऊन 2370 दावे नाकारले (याच गोष्टीने आसामच्या गरीब आणि उपेक्षितांनाही पछाडले आहे!)य जसे की दीपकोर दिपक, वसंतर वसंत, हरिजन किंवा अर्जुन, कांबळे किंवा कांबाळे. एकेक करत नावांमधील या चुका सुधारण्यासाठी कचरा वाहतूक श्रमिक संघाला 2.5 वर्षांचा कालावधी लागला, असे मिलिंद रानडे यांनी सांगितले.

आसाम मध्ये ज्या 14 (व अजून दोन "कमकुवत" कागदपत्रांपैकी) शरणार्थी नोंदणी प्रमाणपत्र, जन्म प्रमाणपत्र, एलआयसी पॉलिसी, जमीन आणि कुळाची नोंद, नागरिकत्व प्रमाणपत्र, पासपोर्ट, शासनाने जारी केलेला परवाना किंवा प्रमाणपत्र, बँक / टपाल कार्यालयीन खाती, कायमस्वरुपी निवासी प्रमाणपत्र, सरकारी रोजगार प्रमाणपत्र, शैक्षणिक प्रमाणपत्र आणि कोर्टाचे नोंदी अशी कागदपत्रे सादर करण्याचा पर्याय होता. आवश्यक पुरावे तयार करूनही 19 लाख नागरिकांना आसाम एनआरसीच्या बाहेर ठेवण्यात आले आणि अनेकांना चुकीच्या पद्धतीने 'परदेशी नागरिक' किंवा 'बेकायदेशीर स्थलांतरित' म्हणून घोषित केले गेले.

## महिला

आसाममधील एनआरसी प्रक्रियेतील धक्कादायक गोष्ट म्हणजे यादीतून वगळल्या गेलेल्यांपैकी 69 टक्के महिला होत्या. कागदपत्रांच्या अभावामुळे अनेक गरीब महिलांना वगळण्यात आले. 1985 पर्यंत जन्म किंवा मृत्यूची नोंद करणे आसाममध्ये सक्तीचे नव्हते. एनआरसी प्रक्रिया ही बाब विचारात घेत नाही. अनेक महिलांचे विवाह वयाच्या 18 वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच झाले होते, त्यामुळे त्यांचे नाव त्यांच्या पालकांसह मतदार यादीमध्ये असत नाही. एनआरसी प्रक्रियेबाबत माहितीचा अभाव आणि कुटुंबप्रमुख पुरुषावर भावनिक आणि आर्थिक अवलंबित्व, तसेच बालविवाह आणि मुलींच्या शिक्षणाचे घटते प्रमाण या करणांमुळे त्यांच्याकडे ओळखीचे वैध पुरावे नसतात. ग्रामीण भागातील किंवा रूढीवादी घरातील बहुतांश महिला मतदार ओळखपत्रासाठी नोंदणी करत नाहीत. शैक्षणिक पदवी आणि जमिनीच्या कागदपत्रे

नसल्याने, स्त्रियांकडे स्वतंत्र ओळखपत्रे नसतात ज्यामुळे एनआरसी प्रक्रियेस त्या विशेष करुन असुरक्षित बनतात. उपेक्षित, मुस्लिम, एससी, एसटी, वनवासी मोठ्या प्रमाणावर निरक्षरता आणि कागदपत्रांची देखभाल करण्याची जाणीव नसणे याचा परिणाम दलित आणि भारतातील आदिवासींवर होणार आहे. आसाम एनआरसी मध्ये, आसाम मधील मूळ रहिवासी असलेल्या 10,00,000 पेक्षा जास्त अनुसूचित जमातींच्या लोकांना 1971 पासूनचा त्यांचा वारसा सिद्ध करण्यास असमर्थत ठरल्याने या यादीतून बाहेर ठेवले गेले.

'शासकीय' जमिनीवर पुनर्वसन केले गेलेले आदिवासी, वनवासी, भूमिहीन छोटे शेतकरी, झोपडपट्टीवासीय, दंगलग्रस्तः असे लाखो भारतीय आहेत ज्यांचे सध्या ज्या जमिनीवर वास्तव्य आहे ती कायदेशीरदृष्ट्या किंवा कागदपत्रांनुसार त्यांच्या मालकीची नाही परंतु गेली अनेक दशके त्यांचा तिच्यावर ताबा आणि वहिवाट आहे. "शासकीय जमीन" म्हणून सार्वजनिक जमीन असलेल्या या जमिनीवर सरकार अंतिम आणि पूर्ण नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे जेणेकरुन कोट्यवधी लोक अनधिकृत बनतील. गेल्या 70 वर्षांत देशभरात झालेले विस्थापन मोठ्या प्रमाणावर उलथापालथ, मूलभूत मानवाधिकार नाकारले जाणे आणि गरीबीला कारणीभूत ठरले आहे.

वन जमिनींची मालकी व देखभाल वन निवासी आणि आदिवासींकडे असते. वन हक्क कायदा 2006 अन्वये त्यांच्या ऐतिहासिक वारशावर कायदेशीररित्या वैयक्तिक आणि सामुदायिक हक्क प्रस्थापित करण्यासाठी ते आज संघर्ष करत आहेत. या समाजघटकांवर एनपीआर–एनआरसी कसा परिणाम करेल?

## गरीबांना सर्वात वाईट फटका बसेल

समाजात फूट पाडणे हाच सरकारचा हेतू असल्याने भारतीय समाजात केवळ उलथापालथच घडणार नाही, तर एकूणच या एनआरसीचा गरिबांना सर्वाधिक त्रास होईल, कारण विशेषतः त्यांना कागदपत्रे गोळा करण्यासाठी वणवण भटकावे लागेल आणि अधिकार्यांकडून विनाकारण छळाचा सामना करावा लागेल.

एनआरसी प्रक्रियेच्या प्रशासकीय खर्चापोटी सरकारी तिजोरीतून कदाचित 55,000 कोटी रू. खर्च होतील, अटक छावण्या उभारण्यासाठी 2-3 लाख कोटी रु. तर अटक छावण्यांमध्ये डांबण्यात येणारया लोकांची काळजी घेण्यासाठी सुमारे 36,000 कोटी रु. खर्च होतील (नॅशनल हेराल्ड). टाईम्स ऑफ इंडियाच्या म्हणण्यानुसार नागरिकत्व पुन्हा मिळविण्याकरिता करावा लागणारा खर्च प्रति व्यक्ती 50,000 रुपये इतका असेल. आसाममध्ये यादीतून वगळलेल्यांनी सुनावण्यांसाठी तब्बल 7,836 कोटी रुपये खर्च केले असल्याचे आढळले आहे. विशेषतः देशातील 22 टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली असताना जेव्हा केव्हा एनआरसी देशात लागू होईल तेव्हा भारतातील आर्थिकदृष्ट्या कंगाल असलेल्या कामगार वर्गाला एनआरसीचा खर्च झेपेल का?

आता, वाईट हेतूने आणि कोणत्याही चर्चेशिवाय एनपीआर–एनआरसी राबवण्याच्या धोक्यामुळे मोठ्या प्रमाणावर भारतीय नागरिकांचा मतदानाचा हक्क काढून घेतला जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लाखोंचा हा एक प्रकारे नागरी मृत्यूच. जरी याचे तात्कालिक लक्ष्य हे निःसंशयपणे धार्मिक अल्पसंख्यांक (विशेषतः मुस्लिम) असले तरीही, उघडपणे मान्य केलेला हिंदुराष्ट्र निर्मितीचा हा प्रकल्प पाहता अंतिम विश्लेषणानुसार, असुरक्षित आणि उपेक्षित वर्गातील सर्व भारतीयांना लक्ष्य आणि त्यांच्यावर वार केला जाण्याचा धोका आहे.

## तुम्हाला माहित आहे काय?

मतदार नोंदणीः भारतात 100% मतदार नोंदणी झालेली नाही. विशेषतः हल्ली, जनतेतील विशिष्ट उपेक्षित घटकांना मतदानाच्या हक्कापासून दूर ठेवण्याबद्दलच्या म्हणजे त्यांना मतदानाचा मूलभूत हक्क नाकारण्याच्या गंभीर समस्या आणि चिंता व्यक्त होत आहेत. एक देश म्हणून आपण सर्व भारतीयांची मतदार म्हणून नोंदणीसुद्धा करू शकलेलो नसताना, आपण एक न्याय्य नोंदणी प्रक्रिया (एनपीआर किंवा एनआरसी) राबवू शकू, अशी अपेक्षा आहे का?
जन्म नोंदणी सांख्यिकीः जन्म नोंदणी सांख्यिकीः जन्म व मृत्यू नोंदणी कायदा 1969 मध्ये लागू करण्यात आला. या कायद्यानुसार सर्व जन्मांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. मात्र युनिसेफच्या म्हणण्यानुसार, "देशातील सध्याचे जन्म आणि मृत्यूंच्या नोंदणीचे प्रमाण हे जन्मांसाठी 58% आणि मृत्यूसाठी 54% इतके आहे. म्हणजे जर जन्मांची नोंदणीसुद्धा 100% होत नसेल तर एनपीआर / एनआरसी सर्वसमावेशक असेल, अशी अपेक्षा आपण कशी काय करू शकतो?

घरांबद्दलची सांख्यिकीः जनगणना 2001 नुसार, 187 दशलक्ष घरे वास्तव्यासाठी किंवा वास्तव्य आणि इतर वापरासाठी

आणि 192 दशलक्ष परिवारांकडून वापरली जात आहेत, असा अहवाल आलेला आहे. 2011 च्या जनगणनेनुसार, भारतात 24.67 कोटी परिवार आहेत. लाईव्हमिंटमधील लेखात या बद्दल अधिक वाचाः भारताच्या गृहनिर्माण क्षेत्राबाबत पाच चार्ट.

पासपोर्ट: आजच्या घडीला भारताच्या 1.3 अब्ज या एकूण लोकसंख्येपैकी केवळ 65 दशलक्ष पासपोर्ट धारक आहेत.
एलआयसी कागदपत्रेः आजही भारतात विमा उतरवण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे, आणि स्पष्टच बोलायचं तर विमा ही एक विशेष बाब आहे कारण आरोग्य आणि संपत्तीच्या मात्र त्यापुरत्याच मर्यादित नसलेल्या अशा अपात्रतेच्या अनेक घटकांमुळे बऱ्याच लोकांना तो नाकारला गेला आहे. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाच्या (आयआरडीएआय) आकडेवारीनुसार (भारतीय विमा सांख्यिकीबाबत माहिती पुस्तिका, 2016—2017) प्रत्येक पॉलिसी एका विशिष्ट नागरिकाशी संबंधित असल्याचे गृहित धरले तर जीवन विमा संरक्षण असणाऱ्या लोकांची संख्या ही एकूण लोकसंख्येच्या 25 टक्के आहे, म्हणजे 75 टक्के किंवा 988 दशलक्ष भारतीयांना विमा—संरक्षण नाही.”
बँक खातीः आजही 190 दशलक्षांहून अधिक लोकांचे बँकेत खाते नाही.

ज्यांच्याकडे स्वतःच्या मालकीची जागा किंवा घरे नसतील, त्यांच्यासाठी एनपीआरध्एनआरसी करता पुरावे / कागदपत्रे यांची मानके काय असतील?

स्थलांतरीत कामगारः त्यानंतर स्थलांतरीत कामगार असलेल्या लाखो भारतीयांचा प्रश्न उभा राहतो, जे आपल्या कायमच्या वास्तव्याच्या ठिकाणी राहत नाहीत.

ज्यांच्या मालकीची घरे नाहीत, जमिनी नाहीत आणि ज्यांना अगदी मतदानाचा हक्कसुद्धा नाही, त्या भारतीय स्थलांतरीत कामगारांची नोंदणी किंवा नोंद एनपीआरध्एनआरसी कशी करणार? राज्यातील कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणे आवश्यक असलेल्या या गटासाठी ही प्रक्रियाच (समावेश होणे / वगळणे) अघोरी आणि दुःखद ठरेल.

भारतातील साक्षरता दर (2018) हा युनेस्कोच्या म्हणण्यानुसार 70.47% आहे. जर एनपीआरला माहिती देणारी प्रक्रिया, निकष, कार्यपद्धती (जी ‘घरोघरी’ सर्वेक्षण अशी आहे) जनगणनेप्रमाणे नसेल ज्यामध्ये माहिती गोळा केली जाते (समावेशक) तर यातून आसामसारखे पण त्याहीपेक्षा मोठ्या प्रमाणावरील संकट निर्माण होण्याचा धोका आहे.

आसामच्या नागरिकत्वाचे संकट हाताळण्यासाठी आम्ही पुढाकार घेऊन केलेल्या कार्याच्या आधारे, स्वयंसेवक, कार्यकर्ते, वकील, कामगार संघटना आणि विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष आणि ऑनलाईन प्रशिक्षण सीजेपी आयोजित करत आहे. तुम्ही तुमच्या जवळच्या प्रशिक्षणात सामील होऊ शकता किंवा तुमच्या भागासाठी एखादे आयोजित करू शकता.

**आम्हाला info@cjp.org.in वर लिहा**

**किंवा आमच्याशी 7506661171 वर संपर्क साधा.**

Twitter : @cjpindia

Instagram : @cjpindia

Facebook : facebook.com/cjpindia

www.cjp.org.in Follow us on @CJPIndia